**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**
**विकास योजना - कराड (दु.सु.) मधील न.र.यो. क्र. १, अ.भू.क्र. ५७२ या जागेवरील पोस्ट ऑफिस आणि स्टाफ क्वाटर्सचे आरक्षण वगळून सार्वजनिक/ निमसार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याकरीता कलम ३७(१) अन्वये निदेश...**

**महाराष्ट्र शासन.**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**शासन निर्णय क्र.टिपीएस-१९१६/३०८/प्र.क्र.६११/नवि-१३**
**दिनांक :-१२/०२/२०१९.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६**

**प्रस्तावना:-** कराड नगरपरिषदेची दुसरी सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख "उक्त विकास योजना" असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम ३१(१) अन्वये शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीएस-१९०९/१३७८/प्र.क्र.१७६६/०९/वि.यो. मंजूरी/नवि-१३, दि.०४/०४/२०१२ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर केली आहे. आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये कराड न.र.यो. क्र. १, अ.भू. क्र. ५६०/२ व ५७२ या जागेवर आ.क्र. ५० "पोस्ट ऑफिस आणि स्टाफ क्वॉटर्स" हे आरक्षण प्रस्तावित असून (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त आरक्षण" असा करण्यात आला आहे) आरक्षणाचे समुचित प्राधिकरण पोस्ट विभाग हे आहे. सदर आरक्षण मंजूर रेखांकनातील बिनशेती भूखंडावर असल्याने शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१ क क) (ग) अन्वये दि. १२/०२/२०१९ रोजीचे अधिसूचनेन्वये अ.भू. क्र. ५६०/२ या भूखंडावरील "पोस्ट ऑफिस आणि स्टाफ क्वॉटर्स" चे आरक्षण वगळून जागा रहिवास विभागात समाविष्ट केली आहे. तथपि यानंतरही उर्वरित आरक्षणात झुलेलाल मंदिर व विद्यमान रस्ता असल्याने उर्वरित आरक्षण देखील वगळून सदर जागा सार्वजनिक/ निमसार्वजनिक समाविष्ट करणे उचित होणार आहे असे शासनाचे मत झाले आहे. त्यामुळे या उद्देशासाठी, शासन कराड नगरपरिषदेस महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खालीलप्रमाणे फेरबदल प्रस्ताव सादर करण्याचे निदेश देत आहे:-

**निदेश**

"विकास योजना - कराड (दुसरी सुधारीत) मधील न.र.यो.क्र. १, अ.भू.क्र. ५७२ या जागेवरील पोस्ट ऑफिस आणि स्टाफ क्वाटर्सचे आरक्षण वगळून विद्यमान मंदीराची जागा सार्वजनिक/निमसार्वजनिक विभागात तर विद्यमान रस्त्याची जागा रस्त्याकरिता दर्शविणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये आवश्यक फेरबदलाची वैधानिक कार्यवाही त्वरीत पूर्ण करुन तसा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा."

प्रस्तुत निदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत सदर फेरबदल प्रस्तावासंदर्भातील कलम ३७(१) खालील सूचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची दक्षता नियोजन प्राधिकरणाने घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI 32 सत्यमेव जयते

**प्रति:-**
मुख्याधिकारी, कराड नगर परिषद, जि. पुणे.

**प्रत माहितीसाठी :-**
१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे,
२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.